## नियमित दिवाणी दावा क्र. १९६/२०२१ मधील नि.क्र.०५ खालील आदेश

(शिवाजी राऊत व ईतर **विरुध्द** अर्जुन म्हेत्रे)

वादी क्र. २ तर्फे प्रतिवादींविरुध्द प्रस्तुतचा अर्ज, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ३९ नियम १ व २ नुसार तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे.

### वादीचे अर्जातील थोडक्यात कथन खालील प्रमाणे :

**०२.** दावा कलम १ मध्ये नमूद केलेली मिळकत (दावा मिळकत) ही वादी यांनी प्रतिवादी यांच्याकडून नोंदणीकृत खरेदीखताधारे विकत घेतलेली असून, सदर मिळकतीमध्ये वादी यांना भविष्यात घर बांधण्याचे प्रयोजन आहे. दावा मिळकतीच्या खरेदी नंतर त्यास नगरपरिषद मिळकत नं. ७९४१/७६७४ असा पडलेला आहे. वादी क्र. १ हा सैन्यामध्ये कार्यरत असल्याने दावा मिळकतीची नोंद वादी क्र. १ यास तलाठी कार्यालयामध्ये करण्यास विलंब झाला.

**०३.** वादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी यांचा विट भट्टीचा व्यवसाय असल्याने प्रशासनाकडून झालेला दंड वादी याच्या नावाची सातबारा सदरी नोंद न झाल्याने सदर वादीच्या मिळकतीवर शासनाने फेरफार क्र. १०६१० अन्वये मंजुर करून त्याचा बोजा टाकला. त्यानंतर, आर.टी. एस. अपिल क्र. ९/२०१५ दाखल करून महाराष्ट्र शासनाचा बोजा कमी करण्याचा आदेश होवुन फेरफार क्र. १०६१० हा रद्द करण्यात आला. त्यानंतर, सदर आदेशाची पुर्व कल्पना असुन देखील प्रतिवादी यांनी तलाठी यांना हाताशी धरून सातबारा सदरी त्याच्या नावाची नोंद करून घेतली आणि दावा मिळकतीमध्ये पाया खोदुन बांधकाम करण्यास सुरूवात केली. प्रतिवादी हा वादीच्या दावा मिळकतीमध्ये असलेल्या कब्जवहीवाटीमध्ये अतिक्रमण करून ताबा टाकण्याचा प्रयत्न करीत आहे. म्हणून तुर्तातुर्त मनाई हुकूम वादीच्या हक्कात पारित करण्याची विनंती केली.

**०४.** प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी हा त्याच्या विधीज्ञामार्फत हजर झालेला असून, त्याने नि.क्र. १६ प्रमाणे आपली कैफियत व म्हणणे दाखल केलेले आहे. प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार, वादीने दावा मिळकतीबाबत नियमीत दिवाणी दावा क्र. ३१५/ २०१५ हा जाहीर ठराव व निरंतर ताकीदीसाठी यापुर्वी दाखल केलेला होता. परंतु सदर दावा दिनांक २०/०३/२०१९ रोजी खारीज करण्यात आलेला आहे. वादीने सदर दाव्याचा जाणीवपुर्वक प्रस्तुत दाव्यात उल्लेख केलेला नाही. वादीची गट नं. १०१६/०२ मध्ये कधीही मालकी नव्हती व नाही. वादीच्या नावाची सातबारा सदरी कसलीही नोंद झालेली नाही. प्रतिवादीने वादीस दावा मिळकतीचे क्षेत्र विक्री केलेले नाही. त्यामुळे, वादींचा दावा मिळकतीशी कसलाही हक्क व हितसंबंध नाही. शेवटी, प्रतिवादीने वादीचा तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

**०५.** वादी व प्रतिवादीच्या कथनांवरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात; त्या प्रत्येक मुद्यांचा निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| ०१. वादीच्या हक्कात सकृतदर्शनी केस आहे काय ? | नाही.. |
| ०२. न्यायाचा झुकता कौल वादीच्या हक्कात आहे काय ? | नाही.. |
| ०३. जर तुर्तातुर्त मनाई हुकुम नाकारला, तर वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल काय ? | नाही.. |
| ०४. आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**०६.** वादींनी प्रस्तूत अर्जाच्या पुष्टयर्थ नि. क्र. ०६ वर शपथपत्र दाखल केलेले आहे. त्याचप्रमाणे नि. क्र. ०३ वरील वर्णन यादी खाली दावा मिळकतीचा सातबारा उतारा, फेरफार क्र. २४१४८ व पोस्टाने पाठविलेल्या नोटीसच्या पावत्या इत्यादी कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेली आहेत.

**०७.** मी वादींतर्फे विद्वान वकील श्री. व्ही. सी. ढाळे आणि प्रतिवादीतर्फे विद्वान वकील श्री. ए. ए. पठाण यांचा युक्तीवाद श्रवण केला.

### मुद्दा क्र.१ ते ४ करिता:

**०८.** मुद्दा क्र. १ ते ३ हे एकमेकांशी सलग्न असल्यामुळे, प्रकरणातील तथ्य व उपलब्ध पुरावा यांची होणारी पुनरावृत्ती टाळण्यासाठी, मी सदर सर्व मुद्दे या ठिकाणी विवेचणासाठी एकत्रीतपणे घेतले आहेत.

**०९.** वादीचे विद्वान वकील श्री. व्ही. सी. ढाळे यांनी युक्तीवाद केला की, दिनांक ३०/०५/२००५ रोजी प्रतिवादीने वादीस दावा मिळकत खरेदीने दिलेली आहे. दावा मिळकतीवर प्रतिवादींची विटभट्टी असल्याने कर न भरल्याने महाराष्ट्र शासनाचे नाव लागले होते. तथापी, प्रांत अधिकारी कर्जत, यांच्या आदेशाचा आधार घेवुन फेरफार क्र. २४१४८ नुसार, वादीच्या क्षेत्रावर प्रतिवादीची चुकीची नोंद घेण्यात आली. प्रतिवादी हे वादीस हरकत अडथळा करत असल्याने तुर्तातुर्त मनाई हुकूम वादींच्या हक्कात मंजुर करण्याची वादीच्या वतीने विनंती केलेली आहे.

**१०.** याउलट, प्रतिवादीचे विद्वान वकील श्री. ए. ए. पठाण यांनी युक्तीवाद केला की, वादीने दावा मिळकतीच्या चतु:सिमा नमूद केलेल्या नाहीत. वादीने ज्या खरेदीखताच्या आधारे दावामिळकत खरेदीने घेतलेली आहे, ते खरेदीखत

अभिलेखावर दाखल केलेले नाही. प्रतिवादी हा दावामिळकतीचा मुळ मालक आहे. वादीचा दावा मिळकतीशी कसलाही संबंध नाही. करीता, प्रतिवादींच्या वतीने अर्ज नामंजुर करण्याची विनंती करण्यात आली.

**११.** अभिलेखाचे अवलोकन करता, असे दिसून येते की, वादीने नि.क्र. ०८ प्रमाणे गट क्र. १०१६/०२ चा सातबारा उतारा अभिलेखावर दाखल केलेला असून, सदर सातबारा उताराचे अवलोकन करता, वादी यांच्या नावाची सातबारा सदरी नोंद असल्याचे दिसून येते. वादींच्या कथनानुसार, दावा मिळकत ही त्यांनी प्रतिवादीकडून खरेदी आधारे घेतलेली आहे. तथापी, वादीने सदर खरेदीदस्त अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्याचप्रमाणे, वादीने दावा मिळकतीच्या चतु:सिमा दाव्यामध्ये स्पष्टपणे नमूद केलेल्या नाहीत. त्यामुळे, केवळ सातबारा उतारावर वादीच्या नावाची नोंद असल्याने तो दावा मिळकतीच्या कब्जे वहीवाटीमध्ये आहे, असे म्हणणे संयुक्तीक होणार नाही.

**१२.** वादीच्या कथनानुसार, खरेदीच्या व्यवहारानंतर दावा मिळकतीस नगरपरिषद मिळकत नं. ७९४१/७६७४ हा पडलेला आहे. वादीने नि.क्र. ०९ प्रमाणे त्याबाबत ग्रामपंचायत नमूना नं. ०८ चा उतारा अभिलेखावर दाखल केलेला आहे. सदर उताराचे अवलोकन करता, त्यावर वादीच्या नावाची मालकी व भोगवटा करणाराचे नाव या रखान्यामध्ये नोंद दिसून येते. तथापी, सदर मालमत्ता क्र. ७९४१/७६७४ ही गट नं. १०१६/०२ चा भाग असल्याबाबत वादी तर्फे कोणताही ठोस व सक्षम पुरावा अभिलेखावर सादर करण्यात आलेला नाही. त्याचप्रमाणे, उपरोक्त उल्लेखीत केल्याप्रमाणे वादीने दावा मिळकतीच्या चतु:सिमा देखील स्पष्टपणे नमूद केलेल्या नाहीत.

**१३.** प्रतिवादीतर्फे नि.क्र. २० वरील वर्णन यादी प्रमाणे दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता, असे दिसून येते की, वादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकती संदर्भात यापुर्वी नियमीत दिवाणी दावा क्र. ३१५/२०१४ प्रतिवादी व इतर पाच लोकांविरूध्द जाहिर ठराव व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला होता. तथापी, सदर दावा हा दिनांक २०/०३/२०१९ रोजी खारीज करण्यात आलेला आहे. वादीने सदर नियमीत दिवाणी दावा क्र. ३१५/२०१४ यापुर्वी दाखल केलेला असल्याबाबत आणि तो खारीज करण्यात आलेला असल्याबाबत प्रस्तुत दाव्यामध्ये कोठेही वाच्यता केलेली नाही. त्यामुळे, वादींनी महत्वाच्या बाबी या न्यायालयापासून झाकुन ठेवण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसून येते. त्यामुळे, वादी हे त्यांची केस स्वच्छ हाताने घेवुन न्यायालयात आले नसल्याचे स्पष्ट दिसून येते.

**१४.** एकंदरीत सर्व बाबींचा सारासार विचार करता आणि दाव्याचे स्वरूप पाहता, वादींनी त्यांच्या हक्कामध्ये प्रथमदर्शनी केस असल्याचे आणि न्यायाचा झुकता कौल वादींच्या बाजुने असल्याचे त्यांनी सिध्द केलेले नाही. त्यामुळे, वर उल्लेखीत केल्याप्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकूम वादींच्या हक्कात पारीत करणे उचित होणार नाही. म्हणुन मी, मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवितो आणि मुद्दा क्र. ४ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

अर्ज (नि.क्र. ०५) खर्चासह नामंजूर करण्यात येतो.

Rajnikant Shesherao Jagtap
Digitally signed by Rajnikant Shesherao Jagtap
Date: 2022.03.11 17:55:27 +0530

दिनांकः ११.०३.२०२२

**(रजनिकांत शे. जगताप)**
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
जामखेड